प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001

**DEPARTMENT OF COMMUNICATION**, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

31 मार्च 2018

**बैंकिंग विनियमन अधिनियम, 1949 (ए.ए.सी.एस) कलम 35 अ अंतर्गत निर्देश–**
**दी कपोल को-ओपरेतिव बैंक लि., मुंबई, महाराष्ट्र**

भारतीय रिझर्व बँकेने, दिनांक 30 मार्च 2017 रोजी दिलेल्या निर्देश च्या अनुषंगाने दी कपोल को-ओपरेटिव बैंक लि. मुंबई, महाराष्ट्र वर दिनांक 30 मार्च 2017 ची कार्यालयीन वेळ संपल्यापासून, सहा महिन्यांपर्यंत, दिशानिर्देश लादण्यात आले होते. निर्देशांची वैधता वेळोवेळी वाढवण्यात आलेली आहे आणि ह्या निर्देशांचा वैधता कालावधी, गेल्या वेळेस दिनांक 25 सप्टेंबर 2017 च्या निर्देश अनुसार, दिनांक 31 मार्च 2018 पर्यंत वाढवण्यात आलेला होता जो बँकेच्या आर्थिक आढाव्यावर पुनरावलोकनाधीन होता.

जनतेच्या माहितीसाठी सुचना देण्यात येत आहे की, भारतीय रिझर्व बैंक, बैंकिंग विनियमन अधिनियम, 1949 कलम 56 चे वाचन करीता, कलम 35अ उप कलम (1) अनुसार, आपल्या प्रदत्त अधिकाराचा वापर करून असा आदेश देत आहे की उपरोक्त दिनांक 25 सप्टेंबर 2017 रोजी दिलेल्या निर्देश व नंतर वेळोवेळी दिलेल्या सुधारित निर्देशा अनुसार निर्देशाचा वैधता कालावधी जो दिनांक 25 सप्टेंबर 2017 च्या सुधारित निर्देश अनुसार, दिनांक 31 मार्च 2018 पर्यंत वाढवण्यात आलेला होता, तो दिनांक 20 मार्च 2018 च्या सुधारित निर्देश द्वारा दिनांक 01 एप्रिल 2018 ते दिनांक 31 जुलै 2018 पर्यंत चार महिन्यासाठी वाढवला आहे, जो बँकेच्या आर्थिक आढाव्यावर पुनरावलोकनाधीन असेल.

संदर्भाधीन निर्देश व वेळोवेळी जारी केलेल्या इतर निर्देशातील कोणत्याही नियम आणि अटी बदललेल्या नाहीत.

दिनांक 20 मार्च 2018 च्या या उपरोक्त सुधारित आदेशाची प्रत बँकेच्या जागेत जनतेच्या माहितीसाठी लावण्यात आलेली आहे.

भारतीय रिझर्व बँकेने केलेल्या या उपरोक्त मुदत वाढीमुळे जनतेने असे गृहीत धरू नये की, बँकेच्या सुधारलेल्या आर्थिक स्थितीवर भारतीय रिझर्व बँक समाधानी आहे.

**अजीत प्रसाद**
सहायक परामर्शदाता

**प्रेस प्रकाशनी: 2017-2018/2595**